● Date of Publication : सोमवार, ८ जानेवारी २०१८, ● Posted at Market yard PSO Pune Daily.•••••••• आर.एन.आय. MAHMAR/2005 रजि. नं. PCW/081/2018-2020/RNI No.14922

# परकी उद्योजकांची पसंती महाराष्ट्रालाच : मुख्यमंत्री

**मुंबई (सकाळ न्यूज नेटवर्क) :** राज्यातील कायदा व सुव्यवस्था चांगली असल्यानेच परकी उद्योजक गुंतवणुकीसाठी पहिली पसंती महाराष्ट्रालाच देतात. राज्यात उद्योगांना कोणत्याही प्रकारची अडचण नाही, असा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला.

राज्यात गुंतवणुकीला चालना देण्याच्या उद्देशाने एमएमआरडीए येथे १८ ते २० फेब्रुवारी या कालावधीत पहिली 'मॅग्नेटिक महाराष्ट्र- कन्व्हर्जन्स २०१८' ही जागतिक गुंतवणूक परिषद होणार आहे. त्यासंदर्भात माहिती देण्यासाठी घेण्यात आलेल्या कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन होणार आहे, असे त्यांनी सांगितले.

अत्याधुनिक उत्पादनाला चालना आणि 'मेक इन इंडिया' उपक्रमाला प्रोत्साहन देण्यासाठी ही परिषद होत आहे. राज्याने तीन वर्षांत औद्योगिक क्षेत्रात चांगली प्रगती केली आहे. आपला घसरलेला क्रमांक सुधारला असून राज्य पुन्हा पहिल्या क्रमांकावर



आले आहे, असा दावाही मुख्यमंत्र्यांनी केला. देशाच्या एकूण परकीय गुंतवणुकीपैकी सुमारे निम्मी गुंतवणूक महाराष्ट्रात होते. पायाभूत सुविधा, निर्यात आणि वित्त क्षेत्रातही राज्य कायम आघाडीवर आहे. १० वर्षांत राज्याची अर्थव्यवस्था तीन दशलक्ष डॉलरपर्यंत पोचेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

राज्यातील नवोदित आणि तरुण व्यावसायिकांना पाठिंबा देण्याच्या दृष्टीने परिषदेत 'मॅग्नेटिक महाराष्ट्र स्टार्टअप अंडर ३०' ही स्पर्धा घेण्यात येणार आहे. यातील विजेत्यांना अनुक्रमे ५० लाख, ३० लाख आणि २० लाखांचे पारितोषिक देण्यात येणार आहे, अशी घोषणा या वेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी केली.

## ›› ७४ टक्के रोजगार निर्माण

**सर्व विभागांच्या तुलनेत उद्योग विभागाची प्रगती २० टक्क्यांनी अधिक आहे. राज्यात २०१६ला 'मेक इन महाराष्ट्र' परिषद झाली. त्याचा सकारात्मक परिणाम झाला. यात २० हजार ९८४ सामंजस्य करार करण्यात आले. त्यातील ५२ टक्के प्रकल्प प्रत्यक्षात सुरू झाले आहेत. प्रस्तावित गुंतवणुकीच्या ६१ टक्के प्रत्यक्ष गुंतवणूक झाली आहे. यातून अपेक्षित असलेल्या २२ लाख रोजगारनिर्मितीपैकी सुमारे ७४ टक्के रोजगार निर्माण झाले आहेत, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.**

# कोरेगाव भीमाप्रकरणी मुख्यमंत्र्यांनी राजीनामा द्यावा

### खासदार अशोक चव्हाण : तीन वर्षांपासून राज्यात जातीय तणाव

**मुंबई (प्रतिनिधी) :** कोरेगाव भीमा प्रकरणात जे काही घडले ते सरकारचे अपयश असून, मुख्यमंत्र्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून तात्काळ आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष, खासदार अशोक चव्हाण यांनी केली आहे.



शनिवारी टिळक भवन दादर येथे काँग्रेस नेत्यांची बैठक झाली. या बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना खा. चव्हाण यांनी सरकारवर जोरदार टीका केली. ते म्हणाले की, कोरेगाव भीमा प्रकरण हे सरकारचे अपयश आहे, अशीच सर्वांची भावना आहे. गेल्या तीन वर्षांपासून राज्यात जातीय तणाव निर्माण झालाय. सरकार त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करित आहे. जातीय तणाव निर्माण करणाऱ्यांवर सरकार कारवाई का करीत नाही? त्यांना अटक का केली जात नाही? सरकारच्या मूक संमतीने जाणीवपूर्वक हे सुरू आहे, असा आरोप करून मुख्यमंत्र्यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी खा. चव्हाण यांनी केली.

काँग्रेस पक्ष राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये शिबिरे घेणार असून काँग्रेस अध्यक्ष खा. राहुल गांधींच्या काही सभा महाराष्ट्रात झाल्या पाहिजेत, अशी नेत्यांची इच्छा आहे. यासंदर्भात प्रदेश काँग्रेस राहुल गांधींना महाराष्ट्रात सभा घेण्याची विनंती करणार आहे, अशी माहिती खा. चव्हाण यांनी दिली. पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले की, मुंबई महापालिकेचे आयुक्त अजोय मेहता यांनी मोघम आरोप करण्यापेक्षा ज्या नेत्याने त्यांना फोन करून त्यांच्यावर दबाव आणला त्या नेत्याचे नाव मेहता यांनी जाहीर करावे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्षांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला देशाचे माजी गृहमंत्री व अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस सुशीलकुमार शिंदे, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, आ. बंटी पाटील, युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष विश्वजित कदम, सरचिटणीस व प्रवक्ते सचिन सावंत, काँग्रेसच्या अनुसूचित जाती विभागाचे अध्यक्ष डॉ. राजू वाघमारे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस अॅड. गणेश पाटील, पृथ्वीराज साठे, रामकिशन ओझा, राजन भोसले, अभिजित सपकाळ, प्रवक्ते अतुल लोंढे उपस्थित होते.

# सावकारी परवाने ऑनलाइन करण्यासाठी मुख्यमंत्र्यांना साकडे

**नागपूर (प्रतिनिधी) :** राज्यातील सावकारी व्यवहारासंदर्भात होणारे सर्व व्यवहार तसेच परवाने नूतनीकरणाची प्रक्रिया ऑनलाइन करावी, अशी मागणी सावकारग्रस्त शेतकरी समितीच्या वतीने करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्षनेते राधाकृष्ण विखे पाटील यांना दिलेल्या निवेदनातून ही मागणी करण्यात आली.

निवेदनानुसार, राज्यात आजमितीस दहा ते बारा हजार परवानाधारक सावकार आहेत. मुंबई सावकारी कायद्यातील परवाने, सावकारी कायदा २०१४ चे कलम ५७ (२) नुसार नियमीत करण्यात आले आहेत. या सावकारांना शासनाने तारणी व विनतारणी कर्ज वाटप करण्याचे अधिकार दिले आहे. सावकारी कायदा २०१४ चे कलम २४ व २५ नुसार परवानाधारक सावकाराने हिशेब ठेवणे, शासनास लेखी विवरणपत्राच्या प्रती देणे बंधनकारक केले आहे. कलम ३१ नुसार व्याजाच्या दरावरील मर्यादा ठरवून दिल्या आहेत. परवानाधारक सावकाराने कलम २४ व २५ चे उल्लंघन केल्यास कलम ४३ मध्ये दंडाची तरतूद आहे.राज्यात सद्या मोठ्या प्रमाणावर शेतकरी परवानाधारक सावकारांकडून सोनेतारण ठेवून कर्ज उचल करीत असतात. बहुतांश सावकार हे नियम १९ नुसार भांडवलखाते कमी रकमेचे दाखवून मोठ्या प्रमाणावर कर्ज व्यवहार करतात. हे कर्ज व्यवहार कच्च्या चिठ्ठ्यांवर दाखवून केले जात आहे. त्यामुळे शासनाची व शेतकऱ्यांची फसवणूक होत आहे. तसेच शेतकऱ्यांना कर्ज वाटप करताना कलम २५ नुसार पासबुकाची प्रत पुरविली जात नाही. या सर्व बाबी लक्षात घेऊन राज्य व केंद्र शानाने सर्व व्यवहार ऑनलाइन व कॅशलेसद्वारे करण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. सावकारग्रस्त शेतकरी समितीचे प्रदेशाध्यक्ष अरुण इंगळे, फुलचंद पाटील, विशाल बावस्कर, विनोद गहेरवार यांनी ही मागणी केली आहे.

# दुष्काळाचे निकष बदला

### माजी कृषी राज्यमंत्र्यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**परभणी (प्रतिनिधी):** दुष्काळ जाहीर करण्यासाठी यंदापासून शासनाने लागू केलेले नवीन निकष कुचकामी आहेत. त्यांचा दुष्काळी परिस्थितीशी कोणताच संबंध नाही. त्यामुळे हे निकष बदलावेत. पूर्वीचे पैसेवारीनुसार दुष्काळ जाहीर करण्याचे निकष कायम ठेवावेत, अशी मागणी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष, माजी कृषी राज्यमंत्री सुरेश वरपुडकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. तसेच खरिपाची अंतिम पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी आल्यामुळे परभणी जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करावा, असेही त्यांनी म्हटले आहे.

जिल्ह्यातील शेतकरी गेल्या काही वर्षांपासून सातत्याने दुष्काळाला सामोरे जात आहेत. यंदा पावसाच्या खंडामुळे सोयाबीन, मूग, उडीद या पिकांचे तर बोंड अळीमुळे कापसाचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. जिल्ह्याची खरिपाची अंतिम पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी आली आहे. परंतु शासनाने यंदापासून दुष्काळ जाहीर करण्यासाठीचे निकष बदलेले आहेत. त्यानुसार ऑक्टोबर महिन्यात राज्यातील केवळ गोंदिया जिल्ह्यातील तीन तालुक्यांत दुष्काळ जाहीर करण्यात आलेला आहे. परभणी जिल्ह्यातील खरीप हंगाम वाया गेलेला असताना नवीन निकषांचा फटका जिल्ह्यातील शेतकऱ्यांना बसल्यामुळे अन्याय झाला आहे. पाऊस, जमिनीतील आर्द्रता आदी निकष ठेवण्यात आले आहेत. एखाद्या पिकाची वाढ सुरवातीच्या काळात समाधानकारक वाटत असली तरी उत्पादन किती झाले यावरच शेतकऱ्यांचे आर्थिक गणित अवलंबून असते.

नवीन निकष कुचकामी आहेत. त्यामुळे काँग्रेस आघाडी सरकारच्या काळातील ५० पैशापेक्षा कमी पैसेवारी आल्यानंतर दुष्काळ जाहीर करण्याचे निकष कायम ठेवावेत. पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी आल्यामुळे परभणी जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करावा. कापूस उत्पादक शेतकऱ्यांना जाहीर करण्यात आलेली मदत तत्काळ देण्यात यावी, अशी मागणी वरपुडकर यांनी केली आहे.

सकाळ अॅग्रोवन — आयोजित
महाधन एक अतूट नातं! — प्रायोजित

अॅग्रोवन संवाद

**'अॅग्रोवन' साधणार शेतकऱ्यांशी संवाद**

कार्यक्रम वेळापत्रक

**मंगळवार, ९ जानेवारी २०१८**

**विषय - ऊस लागवड तंत्रज्ञान**

**वक्ते - श्री. रमेश भंडारे**

(ऊसतज्ज्ञ, मंगळवेढा)

**श्री. साहेबराव बेंदगुडे**

(कृषी विकास अधिकारी, जि. प. सोलापूर)

**स्थळ - बिसलसिध्द मंदिर औराद, ता. द. सोलापूर**

**वेळ - सायं. ५.३० वाजता**

**या मार्गदर्शन मेळाव्याचा आपण व आपल्या शेतकरी मित्रांनी अवश्य लाभ घ्यावा, ही विनंती.**